# ईएसआय योजनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना मदत

## अतिरिक्त आयुक्त व प्रादेशिक संचालक प्रणय सिन्हा यांच्या हस्ते धनादेश

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

**ठाणे :** ईएसआय योजनेत सहभागी दोन कर्मचाऱ्यांच्या अपघाती मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबियांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावली होती. अशा वेळी राज्य विमा महामंडळ या कुटूंबियांच्या मदतीला धावून आले आहे. कर्मचारी राज्य विमा महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय ठाणे येथे अतिरिक्त आयुक्त व प्रादेशिक संचालक प्रणय सिन्हा यांच्या हस्ते मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना धनादेश देण्यात आला. या वेळी उपसंचालक सचिन ताजवे, उपसंचालक संजीव मिश्रा, सहाय्यक संचालक जीवननाथ झा, दिलीपकुमार झा, धीरेंद्र कुमार उपस्थित होते.



## अपघातातील मृत्यूंनतर तातडीने सहकार्य

नवी मुंबई येथे राहणारे भगवान कोळी हे मार्च २०१५ पासून बांधकाम कंपनीत सफाई कामगार म्हणून काम करत होते. १६ एप्रिलला ते कंपनीकडे जाण्यासाठी पायी जात असतानाच एका दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. त्या अपघातात ते जखमी झाले. त्यांना तातडीने सीबीडी बेलापूर रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

कोविड महामारीच्या काळात हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर वाशी शाखेतील विमा महामंडळाच्या अधिकाऱ्याने सर्वेक्षण करून कुटुंबातील सदस्यांना मिळणाऱ्या लाभासंदर्भात मार्गदर्शन केले. वागळे इस्टेट येथील कार्यालयातील कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त व प्रादेशिक संचालक प्रणय सिन्हा यांच्या हस्ते कोळी कुटुंबियांना ७५ हजार ४५५ रुपयांचा धनादेश देण्यात आला, तसेच १६ हजार ६२० रुपये मासिक पेन्शनदेखील सुरू करण्यात आली.

> सर्व कर्मचाऱ्यांनी राज्य विमा नोंदणी केली पाहिजे, जेणेकरुन विमा योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळू शकेल.
> –प्रणय सिन्हा, अतिरिक्त आयुक्त व प्रादेशिक संचालक

याचप्रमाणे खोपोली येथील मेसर्स महिंद्रा प्रायव्हेट कंपनीत २०१६ पासून काम करणारा कर्मचारी हेमंत सोमा राजगुरू कंपनीत गॅस कटरचे काम करत असतानाच अचानक चक्कर येऊन त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर कंपनीने दिलेली सर्व कागदपत्रे शाखा कार्यालयाने प्रादेशिक कार्यालय ठाणे येथे पाठविली.

याअंतर्गत विमाधारक हेमंत सोमा राजगुरू यांच्या कुटुंबाला एकूण ५६ हजार ६४४ रुपयांचा लाभ देण्यात आला. त्याबरोबर डिसेंबर २०२० पासून १४ हजार ७५६ रुपये मासिक पेन्शनदेखील सुरू करण्यात आली.